मराठवाड्यातील भूमिहीन शेतमजुरांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा अभ्यास : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सामाजिकशास्त्रे विद्याशाखे अंतर्गत अर्थशास्त्र या विषयातील पीएच.डी. पदवीसाठी सादर करावयाचा पूर्व संशोधन आराखडा

संशोधक

भुस्से परमेश्वर सुभाषराव

मार्गदर्शक

प्रा. डॉ.सुर्यकांत त्र्यं.पवार

सहाय्यक प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक

अर्थशास्त्र विभाग

लोकमान्य महाविद्यालय, सोनखेड ता.लोहा जि.नांदेड

एप्रिल : २०१७-१८

१.१. प्रस्तावना :-

भारत हा विकसनशिल देश आहे. भारतातील लोकसंख्येचे प्रमाण मोठ्या प्रमाणात वाढत आहे. वाढत्या लोकसंख्येचा भार दिवसेंदिवस कृषीक्षेत्रावरच पडत आहे. देशातील एकून श्रमशक्तीच्या लोकसंख्या जवळपास ५८.२ टक्के भाग कृषी व त्यावर आधारीत उद्योग धंद्यापासून आपली उपजिवीका भागवीत असते. ग्रामीण अर्थव्यवस्थेमध्ये रोजगाराच्या दृष्टिने कृषीक्षेत्राची भूमिका महत्वपूर्ण असल्यामुळे कृषीक्षेत्राच्या विकासावर भारताचा सर्वांगीण विकास अवलंबून असल्याचे समजते. कृषीक्षेत्राचा विकास घडवून आणण्यासाठी कृषीक्षेत्रातील अनेक घटक जबाबदार असतात. त्यातीलच महत्त्वाचा घटक म्हणजे शेतमजूर हा होय, परंतु भारतात कृषीक्षेत्रातील शेतमजुर हा घटक विकासापासून मिळणारी कमी मजुरी, बेकारी, अर्थबेकारी, अनियमीत रोजगार, तंत्रज्ञान कौशल्याचा अभाव, पर्यायी रोजगाराच्या संधीचा अभाव, राहणीमानाचा खालावलेला दर्जा अशा विविध समस्यांचा सामना करावा लागतो. अनुसूचित जाती आणि जमातीमध्ये भूमिहीन शेतमजुरांचे प्रमाण अधिक असून ते असंघटित आहेत.

भारतातील शेतमजुरांना प्रामुख्याने शेतातील हंगामामध्ये नांगरणी करणे-कोळपणी करणे, औषधी फवारणे, पिकांणा पाणी देणे, याबरोबरच पिकांची कापणी करणे इत्यादी कामे करावी लागतात. शेतीचाी कामे हंगामी स्वरुपाची असतात. पेरणीच्या व कापणीच्या हंगामात शेतमजुरांकरिता असणारी मागणी उच्च पातळीवर असते. शेतीक्षेत्रात रोजंदारीवर घेतल्या जाणाऱ्या श्रमिकांकरिता मागणी सापेक्षतेने मर्यादित असते. कारण जमीनमालक आणि त्याच्या कुटूंबातील अन्य व्यक्ति आपल्या शेतावर सर्वसाधारणपणे स्वतः काम करण्यास येत असतात. कोरडवाहु भागात ५ते

६ शेतमजुरांकरिता असणारी मागणी असते आणि सिंचन भागामध्ये ९ ते १० महिन्यांसाठी असते.

गेल्या अनेक वर्षाच्या काळात भारतातील शेतमजुरांच्या संख्येत सातत्याने वाढ होत आहे, या परिस्थितीला अनेक कारणे जबाबदार आहेत. उदा. ग्रामीण समाजाचे विघटन, धारणक्षेत्राच्या आकारात बदल, हस्तव्यवसायाचा व कुटीरोद्योगांचा ऱ्हास, ग्रामीण लोकसंख्येत वाढ, किफायतशीर रोजगाराच्या बिगर शेतकी रोजगाराचा अभाव इत्यादी भारतातील शेतमजुरांची संख्या १९५१ मध्ये २८० लाख, १९६१ मध्ये ३२० लाख, १९७१ मध्ये ४८० लाख, याप्रमाणे होती. सन. १९६१ च्या आणि सन. १९७१ च्या जनगणनेवरुन असे आढळून येते की, ग्रामीण भागातील भूमिहीन शेतमजुरांची वाढ होतआहे.

१९७१ मध्ये महाराष्ट्रात सरासरी एका कुटूंबाकडे साडेचार हेक्टर जमीन होती. २०१५ मध्ये हे प्रमाण दीड हेक्टर पर्यंत खालावलेले आहे. यामुळे शेतकऱ्यांच्या संख्येमध्ये मोठ्या प्रमाणात घट होऊन शेतमजुरांच्या संख्येत वेगाने वाढ होत आहे. महाराष्ट्रामध्ये २००१ मध्ये १ कोटी ८ लाख एवढी भूमिहीन शेतमजुरांची संख्या होती. २०११ मध्ये त्यात वाढ होवून १ कोटी ३४ लाख एवढी झाली. एकीकडे भूमिहीन शेतमजुरांच्या संख्येत झपाट्याने वाढ होत असताना शेतीतील मिळणाऱ्या रोजगारामध्ये मात्र झपाट्याने घट होत आहे. १९९३-९४ मध्ये कृषीक्षेत्रात ७४.१० टक्के शेतमजुरांना रोजगार मिळत होता. तो २००९-१० मध्ये ६२.८० टक्के एवढा कमी झाला.

मराठवाड्यामध्ये कृषीक्षेत्रात आजही विकास झालेला नाही. त्यामुळे मराठवाड्यातील भूमिहीन शेतमजुरांचे प्रमाण दिवसेंदिवस वाढते आहे. मराठवाड्यात

विशेषतः ऊसतोड कामगार व शेतमजुर यांची संख्या जास्त आहे. या ठिकाणचे कृषीक्षेत्र कोरडवाहू असल्यामुळे हंगामी बेरोजगारीचे प्रमाण जास्त आहे. मराठवाड्यातील नांदेड जिल्ह्याचा विचार करताना जिल्ह्यामध्ये काही ठिकाणी कृषीक्षेत्राचा भाग ओलीताखाली आहे तर जास्तीत जास्त भूभाग हा कोरडवाहू आहे. त्यामुळे नांदेड जिल्ह्यातील शेतमजुरांच्या संख्येत घट झाली आहे.

१.२. समस्या सुत्रण :-

महाराष्ट्र शासनाने राज्याबरोबर मराठवाडा व नांदेड जिल्ह्याची अर्थव्यवस्था वृध्दींगत व्हावी. सामान्य लोकांचे व भूमिहीन शेतमजुर यांचे जीवनमान सुधारावे म्हणून कृषीक्षेत्रात संख्यात्मक व तांत्रिक सुधारणा घडवून आणण्यात त्याचबरोबर विविध शासकीय योजना, उपक्रम व कृषीक्षेत्राचा विकास घडवून आणण्यासाठी विकासात्मक कार्यक्रमाची अंमलबजावणी केली आहे. यामुळे मराठवाड्यातील स्थिती सुधारुन त्यांचे राहणीमान सुधारणे अपेक्षित आहे. मराठवाडा व नांदेड जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजुरांचे आर्थिक व सामाजिक स्थिती सुधारली आहे का ? त्यांचे राहणीमान सुधारले आहे का ? भूमिहीन शेतमजुरांच्या संख्येत वाढ किंवा घट झाली आहे का ? नांदेड जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजुरांना शासनाच्या योजनेचा लाभ झाला आहे का ? भूमिहीन शेतमजुरांची उत्पन्नपातळी वाढली आहे का ? शेतीच्या धारण क्षेत्रात बदल झाला आहे का ? शेतीक्षेत्रातील यंत्रसामग्रीच्या साधनात बदल झाला आहे का ? या सर्व प्रश्नांचा शोध घेणे हा या अभ्यासाचा मुख्य हेतु आहे.

१.३. संशोधनाची उद्दिष्टे :-

२. मराठवाड्यातील भूमिहीन शेतमजुरांचा अभ्यास करणे.

३. नांदेड जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजुरांचा अभ्यास करणे.

४. नांदेड जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजुरांच्या आर्थिक स्थितीचा अभ्यास करणे.

५. नांदेड जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजुरांच्या सामाजिक स्थितीचा अभ्यास करणे.

६. नांदेड जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजुरांच्या राहणीमानाचा अभ्यास करणे.

१.४. संशोधनाची गृहितके :-

१. मराठवाड्यातील भूमिहीन शेतमजुरांच्या संख्येत वाढ झाली आहे.

२. नांदेड जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजुरांच्या संख्येत घट झाली आहे.

३. नांदेड जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजुरांच्या आर्थिक स्थिती सुधारली आहे.

४. नांदेड जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजुरांनी शासनाच्या योजनांचा लाभ घेतला आहे.

५. नांदेड जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजुरांचे राहणीमान उंचावले आहे.

१.५. संशोधन पध्दती :-

मराठवाड्यातील भूमिहीन शेतमजुरांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा अभ्यास : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा या विषयाचा अभ्यास करण्यासाठी प्राथमिक आणि दुय्यम साधनाचा आधार घेण्यात आला आहे. या करिता प्राथमिक आधारसामग्रीत सहेतुक नमुना निवड पध्दतीनुसार नांदेड जिल्ह्यातील एकून १६ तालुक्याची निवड करण्यात आली आहे. प्रत्येक तालुक्याती ५ गावाची निवड करुन प्रत्येक गावातून ५ नमुन्याची निवड करण्यात आली आहे. म्हणजेच प्रत्येक तालुक्यातून २५ नमुने विडण्यात आले आहेत. नांदेड जिल्ह्यातील एकून ४००

नमुन्याची निवड माहिती संकलनासाठी केली आहे. या बरोबरच माहिती संकलनासाठी प्रश्नावली आणि अनुसूचीचा आधार घेण्यात आला आहे. तसेच संशोधनासाठी विश्लेषणात्मक आणि वर्णनात्मक संशोधन पध्दतीचा आधार घेण्यात आला.

१.६. संशोधनाची रचनाः-

प्रस्तुत संशोधन कार्य व्यवस्थित पार पाडण्यासाठी या विषयाची विभागणी सहा प्रकरणामध्ये करण्यात अली आहे. ते पुढील प्रमाणे पहाता येईल.

प्रकरण पहिले : प्रस्तावना

प्रकरण दुसरे : संशोधन साहित्याचा आढावा

प्रकरण तिसरे : मराठवाडा व नांदेड जिल्ह्याची तोंड ओळख

प्रकरण चौथे : नांदेड जिल्ह्यातील कृषीक्षेत्राचा विकास व भूमिहीन शेतमजूर

प्रकरण पाचवे : नांदेड जिल्ह्यातील शासनाच्या विविध योजना व भूमिहीन शेतमजूर

प्रकरण सहावे : नांदेड जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास

प्रकरण सातवे : निष्कर्ष आणि शिफारशी

१.७. संशोधनाची व्याप्ती :-

सदरील संशोधनाची व्याप्ती मराठवाड्यापुरती मर्यादित असून त्यात विशेष संदर्भ म्हणून नांदेड जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजुरांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीचा अभ्यास हा नांदेड जिल्ह्यापुरता मर्यादित आहे.

१.८. संशोधनाचे महत्व :-

मराठवाडा विभागातील बहुतेक करुन उद्योग, व्यापार, बँका, कृषी विभाग, पिकरचना, वाहतुक सोयी व शैक्षणिक सोयी इत्यादी क्षेत्राचा अभ्यास करण्यात येणार आहे. अर्थशास्त्र या विषयामध्ये बँक, उद्योगिक क्षेत्र, मानवी निर्देशांक, कृषीक्षेत्र इत्यादीमध्ये खुप मोठ्या प्रमाणात संशोधन झालेले आहे. परंतु त्या प्रमाणात मराठवाडा विभाग व नांदेड जिल्ह्यातील भूमिहीन शेतमजुरांच्या समस्यांवर संशोधन झालेले नाही. म्हणून **मराठवाड्यातील भूमिहीन शेतमजुरांच्या आर्थिक आणि सामाजिक स्थितीचा अभ्यास : विशेष संदर्भ नांदेड जिल्हा** हा विषय निवड्ण्यात आला आहे. त्यामुळे या संशोधनाचा उपयोग महाराष्ट्र शासन, जिल्हा प्रशासन, विविध संशोधन संस्था, संशोधक मंडळी तसेच भूमिहीन शेतमजुरांकरिता ध्येय-धोरणे राबविण्यासाठी हे संशोधन कार्य उपयोगी ठरणारे आहे. त्यामुळे संशोधन विषयाला विशेष महत्व आहे.

१.९. संशोधन मर्यादा :-

प्रस्तुत अभ्यासात प्राथमिक व द्वितीय माहितीवर आधारित आहे. प्राथमिक माहिती प्रश्नावली तयार करुन प्रत्यक्ष भूमिहीन शेतमजुरांना भेटून माहिती संकलीत करण्यात येणार आहे. परंतु भूमिहीन शेतमजुर अचूक माहिती देतीलच असे नाही.

कारण त्यांच्या लाजाळूपणा, रुढी व परंपरा, अज्ञान, अंधश्रध्दा यामुळे अचूक व विश्वसनीय माहिती मिळेल असे गृहित धरता येणार नाही.

द्वितीय सामग्रीवरील आधारित माहितीमध्ये विश्वसनीय आकडेवारीचा अभ्यास, सासकीय गोपनीयता व अपूर्ण माहितीमुळे सामग्री संग्रणावर मर्यादा पडतात. माहितीचा अपुरेपणा ही या संबंधी मर्यादा आहे.

१.१०. संशोधनाचा कालखंड :-

सदरील संशोधनाचा कालखंड १९९०-९१ ते २०१४-१५ असा निश्चित करण्यात आला आहे.

संदर्भसूची :-

१. मोहनभाई कुडारिया, वर्षभरात १२३६० शेतकरी व शेतमजुरांच्या आत्महत्या, कृषी व शेतकरी कल्याण राज्यमंत्री दैनिक दिव्य मराठी, ५ डिसेंबर २०१५, पृ.क्र.०६

२. पवार प्रकाश, विखंडित शेतकरी वर्गाचे वाली कोण, दैनिक लोकसत्ता, १५ जुलै २०१६, पृ.क्र.७

३. ब्राम्हे सुलभा, महाराष्ट्रातील शेतमजुर, प्रकाशन अनिल अवचार फुले समता प्रतिष्ठान, भवानी पेठ, पालखी विठोबा चौक, पुणे, प्रथम आवृत्ती मार्च १९८३, पृ.क्र. १३

४. Harron Sajiad, Employment of landless labour, B.R. Publishing] New Delhi, p.n.04

५. Parmar H. Ramesh, An empirical study of status of women agricultural in india PARIPEX Indian journal of research, p.n.48

६. Registar general and census commissioner india, 2011

७. Krmar Dharma, Caste and landlessness in south india, Delhi Oxford University Press, New Delhi, p.n. 76

८. Government of india, Ministry of labour and Employment Annual report, 2010-11 printed and designed by SMAT from, p.n.2

संशोधक

भुस्से परमेश्वर सुभाषराव

बळीराम पाटील महाविद्यालय, किनवट

मार्गदर्शक

प्रा. डॉ.सुर्यकांत त्र्यं.पवार

सहाय्यक प्राध्यापक व संशोधन मार्गदर्शक

अर्थशास्त्र विभाग

लोकमान्य महाविद्यालय, सोनखेड
ता.लोहा जि.नांदेड